# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

## प्रेसनोट

## पीएमपीएमएल कडून गणेश विसर्जन दिवशीचे बसेसचे नियोजन

दि. १७/०९/२०२४ रोजी गणेश विसर्जनाच्या मिरवणुकीमुळे स्वारगेट चौक, डेक्कन चौक हे बंद होत असल्याने स्वारगेट व डेक्कन चौकातील बस थांबे दि. १७/०९/२०२४ रोजी खालील प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरीत करण्यात येणार आहेत.

| अ.क्र. | मूळ बस स्थानकाचे नाव | मार्ग | तात्पुरते बसेस सुटण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | शाहु महाराज स्थानक (स्वारगेट) | सातारा रोडने कात्रज, मार्केटयार्ड करीता | लक्ष्मी नारायण चौक |
| २. | नटराज बस स्थानक | सिंहगड रोडकडे जाणे करिता | पर्वती पायथा (स्वामी समर्थ मठ) बस थांबा |
| ३. | स्वारगेट स्थानका बाहेर | सोलापूर रोडने पुलगेट, हडपसर करिता | वेगा सेंटर (स्वारगेट डेपो जवळ) |
| ४. | स्वारगेट स्थानका बाहेर | भवानी पेठ, नानापेठ, रास्तापेठ करिता | वेगा सेंटर (स्वारगेट डेपो जवळ) |
| ५. | डेक्कन जिमखाना स्थानक | कोथरूड डेपो, माळवाडी, एनडीए गेट | एस.एन.डी.टी. कॉलेज जवळ |

गणेश विसर्जन दिवशी म्हणजेच दि. १७/०९/२०२४ रोजी शहरातील शिवाजी रोड, बाजीराव रोड, लक्ष्मी रोड, टिळक रोड, कर्वे रोड हे मुख्य रस्ते बस वाहतुकीसाठी बंद राहणार असून प्रवाशांची गैरसोय होऊ नये म्हणून या रस्त्यांवरून संचलनात असलेल्या मूळ स्थानकांहून सुटणाऱ्या बसेसचे संचलन तक्त्यात दिलेल्या तात्पुरत्या बस स्थानकांहून करण्यात येणार आहे, याची सर्व प्रवाशांनी नोंद घ्यावी व सहकार्य करावे असे आवाहन पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून करण्यात येत आहे.

Sd/-
चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन)
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

---

दि. १४/०९/२०२४

मा. संपादक,
दैनिक ..........
यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

Sd/-
कामगार व जनता संपर्क अधिकारी
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.